दै. पुण्यनगरी दि. ११-०२-

# सिंधी पतसंस्था दरोडा प्रकरणातील आरोपी गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; उमरी पोलिसांच्या हवाली केले

**नांदेड/ प्रतिनिधी**

उमरी तालुक्यातील सिंधी येथील कै.व्यंकटराव पा.कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था सिंधीच्या शाखेवर टाकलेल्या दरोडा प्रकरणात फरार असलेल्या एका आरोपीला पोलिसांनी जेरबंद केले आहे.

दि. १ ऑक्टोबर २२ रोजी दुपारी २ ते २.२० दरम्यान सिंधी येथील व्हीपीके साखर कारखान्याच्या समोर कै. व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था, सिंधी ता. उमरी शाखा आहे. या शाखेवर सशस्त्र टोळीने भरदिवसा दरोडा टाकला.या घटनेने एकच खळबळ उडाली होती.

या प्रकरणानंतर सतर्क गावकऱ्यांनी एकाला पकडून बेदम मारहाण केली होती तर अन्य आरोपी फरार झाले होते. या प्रकरणी उमरी पोलिस ठाण्यात गुरनं २४०/२२ कलम ३९५, सहकलम ४/२५ शस्त्र अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणी मोक्का कायद्यान्वये कारवाई करुन तपास करुन तपासाअंती न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. यामधील फरार असलेला आरोपी शेख सोहेल शेख रज्जाक रा. तेहरानगर, शिवाजीनगर, नांदेड हा नांदेडमध्ये असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावर १० फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील सपोनि पांडुरंग माने व त्यांच्या पथकाने शोध घेण्यासाठी



पोलीस अधीक्षक नांदेड यांच्या मार्गदर्शनात गस्त घातली. उपरोक्त आरोपी हा बरकत कॉम्प्लेक्स येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर या पथकाने तेथे शोध घेतला असता आरोपी शेख सोहेल हा पळून जात होता. पाठलाग करुन पोलिसांनी त्याला पकडले.

त्याची चौकशी केली असता त्याने आपली ओळख शेख सोहेल शेख रज्जाक २० रा. तेहरानगर, शिवाजीनगर, नांदेड अशी सांगितली.

त्याच्याविरुध्द अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच सिंधी दरोडा प्रकरणात ही तो आरोपी असल्याने त्याला उमरी पोलिसांच्या हवाली करण्यात आले. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. द्वारकादास चिखलीकर, सपोनि पांडुरंग माने, पोउपनिरीक्षक जसवंतसिंघ शाहू, मोतीराम पवार, तानाजी येळगे, शंकर केंद्रे, हेमंत बिचकेवार यांनी ही कारवाई केली.